

## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# नेमेचि येते टंचाई...



**ग्रामीण-शहरी भागांतील पाणीटंचाईची कारणेही निरनिराळी आहेत. असंतुलित विकासामुळे शिक्षण व रोजगार संधींअभावी स्थलांतरामुळे शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे बहुसंख्य शहरांत पाणी पुरवणे, हे आव्हान ठरले आहे. पुण्यासारख्या शहराच्या डोक्याशी चार धरणे असूनही वाढत्या लोकसंख्येला ते पाणी पुरत नाही.**

एप्रिल महिना सरत नाही, तोच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पाणीटंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. काही अपवाद वगळता ग्रामीण भागापासून ते विकसित शहरांपर्यंत कोणाचीही या टंचाईतून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबई-कोल्हापूरसारख्या शहरांमध्ये आत्ताच पाणीकपातीचा निर्णय घेण्यात आला आहे; तर मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये पाणीटंचाई पाचवीलाच पुजल्याने शेकडो टँकर सुरू झाले आहेत. राजधानी मुंबईच्या शेजारील ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि भिवंडीसारख्या शहरांमध्ये टंचाईचे चटके बसू लागले आहेत. पुण्यासारख्या शहरात अघोषित कपात सुरू झाली आहे, तर अनेक शहरांत आठवड्यातून एकदाच मिळणाऱ्या पाण्यातच जनता समाधान मानत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करणाऱ्या वाड्या-वस्त्यांमधील बायाबापड्यांच्या डोक्यावरील हंडा या जन्मात तरी उतरणार का, हा प्रश्न विचारण्यापलीकडे गेला आहे. त्यातच यंदा 'एल निनो'मुळे अपुरा पाऊस होणार असल्याचा अंदाज असून, पावसाचे आगमनही वेळेत होणार का, हे सांगता येत नाही. दमदार पाऊस होऊन जलस्रोत भरेपर्यंत, म्हणजे किमान दीड महिना तरी पाणीसाठा पुरवून वापरण्याशिवाय पर्याय नाही. गेल्या वर्षी ज्या मराठवाड्यात बंधारे फुटेपर्यंत पाऊस झाला, तेथे काही महिन्यांतच या टंचाईची सर्वाधिक भीषणता जाणवावी, यासारखा दैवदुर्विलास नाही. त्यासह राज्याच्या बहुसंख्य भागांत अतिवृष्टी झाल्यानंतरही पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर का यावी, हा प्रश्नच आहे. त्यासाठी केवळ निसर्गाच्या अवकृपेकडे बोट दाखवून चालणार नाही; नियोजन-व्यवस्थापनाचा अभाव आणि सरकारी अकार्यक्षमतेचे हे परिणाम आहेत. मुळातच महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अपुरे आणि सिंचनावरही मयार्दा आहेत. 'पुणेकर दोनदा अंघोळ करतात,' अशी बालिश वक्तव्ये करून 'ग्रामीण विरुद्ध शहरी' असा वाद पेटवून किंवा वरवरच्या उपाययोजना मांडून मूळ प्रश्नांकडे केली जाणारी सोयीस्कर डोळेझाक कधी तरी थांबवली पाहिजे. पुण्यातील पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये तब्बल ४० टक्के गळती होते; त्यात वितरणातील त्रुटींबरोबरच पाणीचोरीचाही मोठा वाटा आहे. हे रोखण्यासाठी जलवाहिन्यांतून पाणी पुरवणे, जुन्या जलवाहिन्या बदलणे अशी कामे तातडीने हाती घेण्यास महापालिका किंवा राज्य सरकारचे हात कोणी बांधले आहेत? 'पुणे शहराला २४ तास पाणीपुरवठा करू,' अशी घोषणा करून दशकभराचा काळ लोटला; पण अजूनही योजनेच्या टाक्यांची कामे रखडलेली असून, उलटपक्षी आठवड्याला '२४ तास पाणीपुरवठा बंद' राहतो. पूर्वीच्या आश्वासनांचे कारभाऱ्यांना सोयरसुतकही नाही. लातूर, छत्रपती संभाजीनगर किंवा जालन्यासारख्या शहरांतही नागरिकांच्या पदरी फक्त आश्वासनेच आली आहेत. कमी पाऊसमान आणि सिंचनव्यवस्थेवरील मयार्दा लक्षात घेता, पाण्याची बचत आणि फेरवापरावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उजनीसारखे शंभर अब्ज घनफूट (टीएमसी) क्षमतेचे धरण दर वर्षी रिकामे होते आणि त्याच महाकाय धरणाशेजारील सोलापूर शहराला आठवड्यातून एकदा पाणी मिळते, याची कोणालाही खंत वाटत नाही. सर्वाधिक पाणीवापर असलेल्या ऊसासाठी ठिबक-तुषार सिंचनाचा प्रसार करण्यात सरकारला अजूनही यश आलेले नाही आणि त्यासाठी पुरेसे प्रयत्नही होताना दिसत नाहीत. महाराष्ट्रात पाण्याचा फेरवापर करण्याचे प्रमाण अवघे चार टक्के आहे. नियोजन आणि अंमलबजावणीची कूर्मगती पाहता पाच वर्षांत ते प्रमाण ४० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता दिसत नाही. हे तंत्रज्ञान आवाक्यात आणणे आणि प्रक्रियायुक्त पाणी वापरण्यास शेतकऱ्यांना राजी करण्याचे आव्हान आहे. कोट्यवधी रुपयांच्या खर्चानंतरही 'जलयुक्त शिवार' किंवा 'जलजीवन मिशन' सारख्या योजनांचे सर्वदूर परिणाम दिसलेले नाहीत. टंचाई-दुष्काळाची चाहूल लागल्यावरच सरकारला जाग येते आणि पाऊस झाल्यावर सर्व घोषणा हवेत विरतात. ही मानसिकता बदलली नाही, तर दुष्काळमुक्तीच्या घोषणा भाषणांपुरत्याच राहतील, यात प्रत्यवाय नसावा.

# उष्णतेच्या लाटांचे वास्तव




यंदा एप्रिलच्या अखेरच्या आठवड्यात महाराष्ट्रासह मध्य आणि उत्तर भारतातील बहुतांश राज्यांमध्ये कमाल तापमानाचा पारा ४० ते ४६ अंशांच्या दरम्यान पोचला. अशातच एका खासगी वेबसाइटने जगातील सर्वाधिक तापमानाच्या १०० शहरांची यादी जाहीर केली. या १०० शहरांपैकी ९५ शहरे भारतातील असल्याचे आणि सर्वोच्च स्थानी महाराष्ट्रातील अकोला (४६.९ अंश सेल्सिअस) असल्याचे दिसून आल्यावर माध्यमांनी आणि सोशल मीडियाने या आकडेवारीला मोठी प्रसिद्धी दिली. झाडे तोडल्याचा, विकासाचा हा परिणाम असल्यापासून ते ग्लोबल वॉर्मिंग, एल निनोपर्यंत कारणे देत यावर चर्चा झाली. व्हॉट्सॲपवरील फॉरवर्डने तर कहर केला. 'मे महिन्याच्या मध्यापर्यंत देशातील कमाल तापमान ५५ अंशांपर्यंत जाईल. मोबाईलची बॅटरी फुटेल,' अशा आशयाच्या मेसेजमुळे लोकांच्या चिंतेत भर पडली.

महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये काही ठिकाणी तीव्र उष्णतेच्या लाटेची स्थिती असून, उष्माघाताच्या घटनांमध्येही वाढ होत आहे ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सोशल मीडियावर तापमानावरून होणारी चर्चा आणि डिजिटल माध्यमांवरील व्हिडीओमधून केले जाणारे दावे यांमध्ये शास्त्रीय माहितीचा अभावही दिसून येत आहे.

सूर्य २१ मार्चला विषुववृत्त ओलांडून उत्तर गोलार्धाच्या आकाशात उत्तरेकडे सरकू लागतो आणि उत्तर गोलार्धातील उन्हाळा सुरू होतो. २१ जून रोजी तो त्याच्या सर्वोच्च उत्तर स्थानी म्हणजे कर्कवृत्तावर पोचतो. त्यानंतर पुन्हा त्याचे दक्षिणायन सुरू होते. २२ सप्टेंबरला त्याने विषुववृत्त ओलांडले की, उत्तर गोलार्धाचा उन्हाळा संपतो. या कालावधीत भारतात मार्च ते मे या महिन्यांमध्ये उन्हाळा किंवा मान्सूनपूर्व हंगाम आणि जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये मान्सूनचा हंगाम असतो. जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये उन्हाळा असूनही मोसमी वाऱ्यांचा प्रवाह आणि ढगांमुळे देशात कमाल तापमानात मोठी वाढ दिसून येत नाही. १० एप्रिलला सूर्य कन्याकुमारीच्या अगदी डोक्यावर असतो. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या दक्षिण भारतावर उन्हाळ्याचा प्रभाव तेव्हापासून सुरू होतो. मान्सून सर्वसाधारणपणे एक जूनला केरळमध्ये दाखल होऊन आठ जुलैला तो संपूर्ण देश व्यापतो. त्यामुळे देशाच्या विविध प्रदेशांत सर्वसाधारणपणे ५० ते ८० दिवस उन्हाळ्याचे असतात.

जसा दरवर्षीचा मान्सून वेगळा असतो, तसाच उन्हाळाही वेगळा असतो. या ५० ते ८० दिवसांमध्ये काही वर्षी उष्णतेच्या लाटा अधिक येतात, तर काही वर्षी सरासरीपेक्षा जास्त मान्सूनपूर्व सरींमुळे कमाल तापमान कमी नोंदले जाते. एप्रिलमध्ये या आधीही अनेकदा कमाल तापमान चाळीस अंशांच्यावर नोंदले गेले असून, महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटांची स्थितीही तयार झाली आहे. अकोल्याचे ४६.९ अंश तापमान सध्या चर्चेत आहे. मात्र, याआधी २९ एप्रिल २०१३ ला चंद्रपूरमध्ये ४७.६ अंश सेल्सिअस, नागपूरमध्ये ३० एप्रिल २००९ ला ४७.१ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले होते. २०१६ ते २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये पाच वेळा कमाल तापमान ४५ अंश किंवा त्यापेक्षा जास्त नोंदले गेले. याचा अर्थ एप्रिलमध्ये उष्णतेची लाट यावर्षी पहिल्यांदाच आलेली नाही. भारताचे भौगोलिक स्थान पाहता, सर्वोच्च तापमानाच्या जागतिक यादीत एप्रिल, मेमध्ये भारतातील अनेक शहरे वरच्या स्थानावर असणे असामान्य नाही. ही स्थिती आता दरवर्षी अशीच असेल असे म्हणणेही योग्य ठरणार नाही.

तापमान, आर्द्रता, वारे, दाब आणि पाऊस या घटकांवर एखाद्या ठिकाणचे ठराविक स्थितीत हवामान अवलंबून असते. वारे समुद्रावरून येत आहेत की जमिनीवरून, हवेत बाष्प जास्त आहे की कमी, वातावरणाचा दाब जास्त आहे की कमी यांवर एखाद्या ठिकाणच्या तापमानातील चढ- उतार अवलंबून असतात. वातावरणाचा दाब कमी असेल, तर त्या भागावर ढगांची निर्मिती होण्याची शक्यता वाढते. दाब जास्त असेल, तर ढग तयार न होता हवा कोरडी राहून उन्हाळ्यात उष्णता साचून राहते. वारे जमिनीवरून आले तर ते कोरडे असतात. मात्र, समुद्रावरून आले तर ते बाष्पयुक्त असू शकतात. उन्हाळ्यात सर्वसाधारणपणे समुद्रापासून दूर असलेल्या भागांमध्ये कोरड्या हवेमुळे कमाल तापमान ४० अंशांपेक्षा जास्त असते. किनारपट्टीजवळील भागात मात्र, समुद्रावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे तापमान सहसा ४० अंशांच्या वर जात नाही.

महाराष्ट्रासह देशात सध्या सुरू असलेल्या उष्णतेच्या लाटांमागे असेच वेगवेगळे घटक कारणीभूत असल्याचे हवामानतज्ज्ञांचे म्हणणे आहे. एप्रिल, मे हे जसे उन्हाळ्याचे महिने आहेत, तसेच ते मान्सूनपूर्व पावसाचेही महिने आहेत. महाराष्ट्रासह दक्षिण भारतात या काळात समुद्रावरून बाष्प येण्यास सुरुवात होते. वाढलेले कमाल तापमान आणि आर्द्रता यांच्या संयोगामुळे स्थानिक पातळीवर उंच ढगांची निर्मिती होऊन मेघगर्जनेसह पाऊस होतो. याच काळात उत्तर भारतात पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे पाऊस होत असतो. हा पाऊस वाढणाऱ्या तापमानाला काहीसे नियंत्रित करत असतो. यंदा या पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्याने दीर्घकाळ हवा कोरडी राहून उष्णतेच्या लाटांचे दिवस वाढत गेले. याच्या जोडीला महाराष्ट्रावर वातावरणाच्या मधल्या थरात जास्त दाबाचे क्षेत्र (अँटी सायक्लोनिक स्थिती) सक्रिय राहिल्याने जमिनीजवळ उष्णता साचून राहण्यास मदत झाली. पंजाब, हरियाणा, राजस्थानपासून दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातपर्यंतच्या मोठ्या प्रदेशात कोरड्या हवेमुळे अनेक ठिकाणी आठवडाभरापेक्षा जास्त काळ कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदले गेले. महाराष्ट्रात विदर्भात याची तीव्रता अधिक आहे.

वाढणाऱ्या तापमानाचा परिणाम ग्रामीण भाग किंवा वनक्षेत्रापेक्षा शहरांमध्ये जास्त जाणवतो. शहरांमधील बहुतांश भाग हा इमारती आणि रस्त्यांमुळे कॉंक्रीटने व्यापलेला असतो. अनेक इमारतींना काचेच्या भिंती असतात. दिवसा कॉंक्रीट तापल्यावर त्याच्या लगतची हवादेखील दीर्घकाळ उष्ण राहते. गरम झालेल्या हवेचे इमारतींच्या गर्दीमुळे योग्यप्रकारे वहन होत नाही. यातूनच शहरावर एखाद्या उष्ण बेटासारखी (हिट आयलंड) स्थिती तयार होते. त्यामुळे उष्णतेच्या लाटेच्या स्थितीत एकाच जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील कमाल तापमानात मोठी तफावत दिसून येते.

कमाल तापमानासोबत हवेतील बाष्पाचेही प्रमाण काहीसे वाढले, तर उष्मा निदेर्शांक त (हिट इंडेक्स) वाढ होत असते. वाढलेला उष्मा निदेर्शांक मानवी आरोग्यासाठी जास्त धोकादायक ठरू शकतो. हवेचे तापमान आपल्या शरीराच्या तापमानापेक्षा जास्त झाल्यास नैसर्गिकपणे घाम येऊन त्याद्वारे आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्याची प्रक्रिया होत असते. मात्र, हवेत उष्णतेसोबत बाष्पही ठराविक प्रमाणापेक्षा जास्त असल्यास घाम येण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो आणि शरीराचे तापमान वाढून त्याचा थेट परिणाम मेंदूसह विविध अवयवांवर होतो. एप्रिल २०२३ मध्ये खारघर येथे झालेल्या कार्यक्रमात १५ जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला होता. त्यामागील कारणही वाढलेला उष्मा निदेर्शांकच होते.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) जाहीर केलेल्या उन्हाळ्याच्या अंदाजानुसार, यंदा एप्रिल ते जून या कालावधीत देशात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. याच काळात महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचे दिवसही सरासरीपेक्षा जास्त राहू शकतात. सध्याची स्थिती पाहता, हा अंदाज योग्यच असल्याचे दिसून येत आहे. आयएमडीच्या निकषांनुसार मैदानी प्रदेशात कमाल तापमानाचा पारा ४० अंश; तर पर्वतीय क्षेत्रात ३० अंशांवर पोचल्यावर उष्णतेची लाट निश्चित करण्यासाठीचे निकष लावले जातात. जर एखाद्या ठिकाणचे तापमान तेथील सर्वसाधारण तापमानाच्या तुलनेत ४.५ ते ६.४ अंश सेल्सिअसने जास्त नोंदले गेले, तर त्या स्थितीला उष्णतेची लाट आणि ६.४ अंशांपेक्षा जास्त नोंदले गेले, तर त्या स्थितीला तीव्र उष्णतेची लाट म्हटले जाते. सध्या देशातील अनेक शहरांमध्ये सर्वसाधारण तापमानाच्या तुलनेत तीन ते सहा अंशांची वाढ नोंदली गेली असून, कमाल तापमान ४० ते ४६ अंशांच्या दरम्यान नोंदले जात आहे. या स्थितीचा थेट परिणाम विविध राज्यांमध्ये दिसूनही येत आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत दोन महिला आणि एका नऊ महिन्यांच्या बालिकेचा उष्माघातसदृश त्रासामुळे मृत्यू झाल्याची नोंद झाली असून, विविध जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या त्रासामुळे ४० पेक्षा अधिक रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

देशात गेल्या पाच दशकांमध्ये उष्माघाताने सुमारे १७००० जणांचा मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते. शारीरिक कष्टाची कामे करणारे, शेतकरी, लहान मुले, वृद्ध यांना उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. सध्याच्या स्थितीत केंद्र सरकारतर्फे सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्माघातावर उपचार करण्यासाठी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. मात्र, उष्माघाताचा त्रास होऊ नये यासाठी नागरिकांनी स्वतः काळजी घेणे आवश्यक आहे. उष्णतेची लाट सुरू असताना सकाळी ११ ते दुपारी चार या वेळेत बाहेर जाणे, शरीराचे तापमान वाढणार नाही याची दक्षता घेणे, पुरेसे पाणी पीत राहणे, कामाच्या वेळा बदलणे यातूनही उष्माघाताचा धोका टाळता येऊ शकतो.

सध्याच्या उष्णतेच्या लाटेपासून काहीसा दिलासा देणारा अंदाज आयएमडीने जाहीर केला आहे. येत्या २९ एप्रिलपासून चार मेपर्यंत उत्तर भारतावर पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांच्या प्रवाहामधील कमी दाबाच्या क्षेत्राचा (वेस्टर्न डिस्टर्बन्स) प्रभाव राहणार आहे. या वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे वायव्य, उत्तर आणि मध्य भारतासह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे पुढील पाच- सहा दिवस महाराष्ट्रासह मध्य आणि उत्तर भारतात कमाल तापमान दोन ते तीन अंशांनी कमी होण्याची शक्यता असून, सध्याच्या दाहापासून त्यामुळे काहीसा दिलासा मिळू शकतो. मे महिन्यात वळवाचा पाऊस कसा होतो, मान्सूनचे आगमन कधी होते यावर उर्वरित उन्हाळा तापदायक ठरेल का, हे अवलंबून असेल.

# 'एल निनो' चा खेळ



विविध जागतिक हवामान संस्थांच्या मॉडेल्सनुसार पुढील काही महिन्यांत हा 'एल निनो' अधिक मजबूत होईल, आणि काही परिस्थितींमध्ये तो 'सुपर' स्तर गाठू शकतो. हवामान बदलाच्या संकटात हा 'दुष्काळात तेरावा महिना' ठरू शकतो.

'एल निनो' हा शब्द आपल्या कानावर हमखास पडतो; कधी भारतातील नैऋत्य मान्सूनसंदभार्तील चर्चांमध्ये, तर कधी जागतिक हवामान बदलाच्या मोठ्या चित्रात. भारतीय उपखंडासाठी नैऋत्य मान्सून हा केवळ ऋतू नसून जीवनरेखा आहे, कारण वर्षभरात पडणाऱ्या पावसाच्या ७५ % हून अधिक पाऊस हा केवळ नैऋत्य मान्सूनमुळे पडतो. त्यामुळे त्यावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही घटनेकडे लक्ष जाणं स्वाभाविकच आहे. अलीकडच्या चर्चांमध्ये आता 'सुपर एल निनो' किंवा काही माध्यमांत 'गॉडझिला एल निनो' असा उल्लेख अधिक ठळकपणे ऐकू येत आहे, पण 'एल निनो' परिणाम नेमका काय असतो? तो भारतासह जगावर कसा परिणाम करतो? खरोखरच या वर्षी 'सुपर एल निनो' बनू शकतो का? आणि तसं झाल्यास जागतिक हवामानावर काय परिणाम होतील? या सर्व प्रश्नांची उत्तरं जाणून घेणं आवश्यक आहे.

'एल निनो' हा शब्द स्पॅनिश भाषेतून आलेला आहे आणि त्याचा थेट संबंध प्रशांत महासागराशी आहे. पेरू (दक्षिण अमेरिका) देशातील मच्छिमारांनी हा शब्द प्रथम वापरला होता. खिसमसच्या काळात पेरू जवळील प्रशांत महासागरातील पाण्याचं तापमान वाढलं की माशांची संख्या अचानक कमी होते, असं त्यांच्या लक्षात आले. त्यांनी याला 'एल निनो' म्हणजे 'खिस्त बालक' असे नाव दिले. सुरुवातीला ही घटना फक्त स्थानिक समुद्री बदल म्हणून पाहिली जात होती, पण पुढे वैज्ञानिक निरीक्षणातून लक्षात आलं की ही घटना जागतिक हवामानाशी जोडलेली आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिल्यास 'एल निनो' ही प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठ तापमानातील असामान्य वाढ आहे. विशेषतः मध्य आणि पूर्व विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील पाणी नेहमीपेक्षा जास्त गरम होते, आणि हीच अनियमितता जगातील हवामानात मोठे बदल घडवते. साधारणपणे 'एल निनो'ची ही प्रक्रिया दर दोन ते सात वर्षांनी पुन्हा दिसून येते.

'एल निनो' कसा तयार होतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. सामान्य परिस्थितीत 'ट्रेड विंड्स' म्हणजेच व्यापारी वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे (दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यापासून इंडोनेशियाकडे) वाहतात. हे वारे समुद्राच्या पृष्ठभागावरील गरम पाणी पश्चिम प्रशांत महासागरातील भागात ढकलतात. त्यामुळे इंडोनेशिया आणि आसपासच्या भागात गरम पाण्याचा मोठा साठा तयार होतो, पण काही वेळा हे व्यापारी वारे कमकुवत होतात किंवा दिशा बदलतात. इंडोनेशियाजवळून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणारे वारे सुरू झाले की हे साठलेले गरम पाणी पूर्व प्रशांत महासागराच्या दिशेने सरकते. यामुळे पूर्वेकडील समुद्रपृष्ठ तापमान अचानक वाढते, आणि 'एल निनो'चा जन्म होतो. सामान्यपणे एप्रिलनंतर एल निनो निर्माण होतो आणि डिसेंबर महिन्याच्या आसपास त्याची तीव्रता सर्वांत अधिक असते. 'एल निनो' किती तीव्र होईल हे प्रशांत महासागरात किती उष्णता आहे आणि वाऱ्यांची स्थिती काय आहे यावर अवलंबून असते.


या उष्ण पाण्यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात वाफ आणि ढग तयार होतात. परिणामी पूर्व प्रशांत महासागरात मुसळधार पाऊस पडतो आणि वादळांमध्ये वाढ होते. ही बदललेली उष्णता आणि दाब प्रणाली जागतिक हवामान चक्र बदलते. 'एल निनो'च्या काळात वातावरणात मोठ्या प्रमाणात उष्णता सोडली जाते, ज्यामुळे जागतिक सरासरी तापमान वाढते. २०२३ मध्ये 'एल निनो' निर्माण झाला आणि त्यानंतरच्या काळात जागतिक तापमानात मोठी वाढ नोंदवली गेली. २०२४ हे आतापर्यंतचे सर्वांत उष्ण वर्ष ठरले. मागील तीन वर्षे (२०२३ ते २०२५) ही नोंदवलेल्या इतिहासातील सर्वांत उष्ण तीन वर्षे ठरली आहेत. 'एल निनो'मुळे काही भागांत तीव्र दुष्काळ पडतो (उदा. ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया), तर काही ठिकाणी अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण होते (उदा. दक्षिण अमेरिका). तसेच उष्णतेच्या लाटा, वणवे, आणि उष्णकटिबंधीय वादळांच्या पॅटर्नमध्येही बदल दिसून येतात. अटलांटिक महासागरावर तयार होणाऱ्या चक्रीवादळांची संख्या कमी होते. 'एल निनो'चा नकारात्मक प्रभाव भारताच्या नैऋत्य मान्सूनवर दिसून येतो. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्येही कमी पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. २००२, २००९, २०१५, २०१८ आणि २०२३ या वर्षांमध्ये मान्सून लक्षणीयरीत्या कमजोर राहिला आणि अनेक भागांत पाणीटंचाई निर्माण झाली. हे सर्वच 'एल निनो'ची वर्षे होती!

'एल निनो' मोजण्यासाठी वैज्ञानिक मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठ तापमानातील बदल पाहतात आणि त्याची तुलना दीर्घकालीन सरासरीशी करतात. जेव्हा हे तापमान साधारण २ अंश से. किंवा त्याहून अधिक वाढते, तेव्हा काही वेळा त्याला 'सुपर एल निनो' असे म्हटले जाते. मात्र हे अधिकृत वैज्ञानिक वर्गीकरण नाही, तर लोकप्रिय माध्यमांमध्ये वापरला जाणारा शब्द आहे. १९५० ते २०२५ या काळात १९५७, १९६५, १९७२, १९८२, १९९१, १९९७ आणि २०१५ या वर्षांमध्ये असे सुपर 'एल निनो' नोंदवले गेले आहेत. यातील विशेष उदाहरण म्हणजे १९९७ चा 'एल निनो'. त्या वेळी असा अंदाज होता की भारतात मान्सून अत्यंत कमजोर राहील. मात्र प्रत्यक्षात देशभरात सरासरीपेक्षा सुमारे दोन टक्के अधिक पाऊस झाला. या घटनेनंतर वैज्ञानिकांना लक्षात आलं की 'एल निनो'चा प्रभाव एकटाच निर्णायक नसतो; त्यावर भारतीय महासागरातील परिस्थितीही परिणाम करते.

सध्या 'एल निनो'ची स्थिती विकसित होत आहे आणि ती मागील घटनांच्या तुलनेत अधिक वेगाने तयार होत असल्याचे दिसते. विविध जागतिक हवामान संस्थांच्या मॉडेल्सनुसार पुढील काही महिन्यांत हा 'एल निनो' अधिक मजबूत होईल, आणि काही परिस्थितींमध्ये तो 'सुपर' स्तर गाठू शकतो. सध्या प्रशांत महासागराच्या उप-पृष्ठभागात मोठ्या प्रमाणात उष्णता साठलेली आहे, जी या प्रक्रियेला अधिक बळ देत आहे. जून ते जुलै काळापासून 'एल निनो'चा प्रभाव दिसून येईल अशी सध्याची स्थिती आहे. यामुळे यंदा महाराष्ट्रासह भारतात नैऋत्य मान्सूनचा एकूण पाऊस सरासरीपेक्षा कमी राहील, असा अंदाज आहे. तसेच जागतिक स्तरावर या वर्षाच्या उत्तरार्धात आणि २०२७ मध्ये सरासरी तापमानात आणखी वाढ होऊ शकते. त्यामुळे हवामानातील टोकाचे बदल अधिक तीव्र होऊ शकतात.

हिमालयातील घटते बर्फ आणि एल निनो

महाराष्ट्रातील अकोला आणि अमरावती येथे कमाल तापमान जवळपास ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले, तर राज्यातील अनेक भागांमध्ये ते ४० अंशांच्या पुढे गेले. राज्यातील तापमानवाढ ही प्रामुख्याने स्थानिक कारणांमुळे झाली असून, कोरडे हवामान आणि उत्तर-पश्चिम भारतातून येणारे उष्ण व कोरडे वारे यासाठी जबाबदार होते, मात्र राज्यातील या तापमानवाढीचा एल निनोशी थेट संबंध नाही. कारण एल निनो स्थिती तयार होण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. गेल्या काही वर्षांपासून उत्तर भारतात हिवाळ्याच्या काळात पाऊस आणि हिमवृष्टी कमी होत असल्याचे दिसून आले आहे. १९५१ ते २०२५ या कालावधीचा अभ्यास केल्यास उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात हिवाळ्यातील पर्जन्यमानात घट झालेली आढळते, ज्याचा परिणाम बर्फवृष्टीवरही होतो. मात्र या बदलांमध्ये 'एल निनो'चा थेट वाटा आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही, कारण हा दीर्घकालीन मानवनिर्मित हवामान बदलाचा परिणाम आहे. मानवी क्रियांमुळे, विशेषतः कार्बन डायऑक्साइडसारख्या हरितगृह वायूंचे प्रमाण विक्रमी पातळीवर वाढले असून हे वायू उष्णता अडकवतात, त्यामुळे तापमानात वाढ होते.



# भाडोत्री बाबांचा बेछूट भंपकपणा!

मध्य प्रदेशातील बागेश्वर धामचे बागेश्वर बाबा म्हणजेच धीरेंद्र शास्त्री यांनी महाराष्ट्रात येऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जे वादग्रस्त विधान केले आहे, त्यामुळे विशेषतः राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपची मोठी गोची झाली आहे. त्या मुद्द्यावरून भाजपला विरोधकांनी कोंडीत पकडले आहे. विषय शिवरायांचा असल्यामुळे भाजपलाही तोंड उघडणे मुष्कील झाले आहे. तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण फडणवीस यांना बागेश्वर बाबांना दुखवून उत्तर भारतीयांना नाराज करायचे नाही. खरे तर मुख्यमंत्र्यांना बागेश्वर यांच्या अज्ञानाबद्दल चार खडे बोल त्यांना सुनावता आले असते, पण त्यांनी तसे केले नाही, पण हेच जर अन्य कुणी केले असते, तर ते त्यांनी गळ्याच्या शिरा ताणून छत्रपती शिवाजी महाराज कसे महान होते, हे सांगून त्यांचा महिमा गायला असता. पण बागेश्वर यांच्याबाबत ते फारसे काही बोलताना दिसत नाहीत. त्यात बागेश्वर यांनी बोलताना समर्थ रामदास यांना मोठेपण दिलेले आहे. त्यामुळे फडणवीस त्याविरोधात जास्त आक्रमक भूमिका घेणार नाहीत हे ओघाने आलेच. नागपूरच्या जामठा येथे असलेल्या नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल परिसरात शुक्रवारी भारतदुर्गा मंदिराचे भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देताना बागेश्वर म्हणाले होते की, एका मोहिमेनंतर शिवाजी महाराज थकले होते आणि ते समर्थ रामदास स्वामींकडे गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला मुकुट काढून समर्थ रामदास स्वामींच्या पायाशी ठेवत आपण थकलो असून आता राज्यकारभार आपण सांभाळावा, अशी विनंती केली होती. त्यावर रामदास स्वामींनी 'तू माझा शिष्य आहेस आणि मी तुझा गुरू' असे सांगत पुन्हा मुकुट छत्रपती शिवाजी महाराजांच्या मस्तकावर ठेवला आणि राज्यकारभार चालवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. मुळात अशा ऐतिहासिक व्यक्तींबद्दल बोलताना बागेश्वर यांच्याकडे तसे काही पुरावे आहेत का, हा एक प्रश्न आहे. ही व्यक्तिमत्वे होऊन गेलेली आहेत. हे काही दंतकथेतील नायक नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी भाष्य करताना ते जबाबदारीने करायला हवे. मुळात बागेश्वर यांच्यासारखी माणसे आध्यात्मिक प्रवचने सांगत असतात. बागेश्वर हे लोकांच्या मनात काही आहे ते जाणतात, ते लिहून देतात. अगदी त्यांच्या सांस्कृतिक मेळाव्यात कुणाची वस्तू चोरीला गेली तेही त्यांना कळते, ते नावासह सांगतात, असे मानले जाते. सोशल मीडियामुळे त्यांची सगळीकडे वेगाने प्रसिद्धी झालेली आहे. त्यांच्या चमत्कारामुळे तर ते अल्पावधीत आणि कमी वयात सर्वदूर पोहोचले आहेत. विशेषतः हिंदू धर्मियांवर त्यांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळेच ते भाजपला जास्त प्रिय आहेत. परिणामी अशा माणसाने वादग्रस्त वक्तव्य केले असले तरी त्याला लगेच दुखावता येत नाही. अर्थात, बागेश्वर यांच्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातून अनेकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. त्यात काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे लोक जास्त ताकदीने उतरले. सातारा आणि कोल्हापूर येथील राजघराण्यातील मान्यवर बागेश्वर यांच्याविरोधात उतरले. त्यांनी बागेश्वरवरून भाजपला टार्गेट केले. अगोदरच महाराष्ट्रात एका भोंदू बाबामुळे भाजपचे वांदे झालेले आहेत. कारण मंत्रिमंडळातील बरेच आमदार आणि मंत्री त्या बाबाचे भक्त असल्याचे उघड झालेले आहे. त्यामुळे आधीच एका भोंदू बाबामुळे बेजार त्यात पुन्हा या बाबामुळे डोकेदुखी वाढली. त्यामुळे भाजपकडून त्याला काही सूचना गेल्या असाव्यात. त्यामुळे बागेश्वर यांनी आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागितली. त्यांनी माफी मागितली हे योग्य झाले. पण अशा प्रकारचे वक्तव्य करण्याचे त्याचे प्रेरणास्थान कुठले आहे, याचा शोध घ्यायला हवा. कारण हे बागेश्वर बाबा स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवतात, तर मग त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वाचला असेल तर त्यांना आपण काय बोलतोय याचे भान असायला हवे होते. महाराष्ट्रात येऊन जर ते उत्तर भारतामध्ये अजूनही भक्कम असलेले वर्णश्रेष्ठत्व रुजवू पहात असतील, तर ते कदापिही योग्य नाही. कारण महाराष्ट्र हा नेहमीच पुरोगामी राहिलेला आहे, त्यामुळे महाराष्ट्राकडून अन्य राज्यांनी सामाजिक सुधारणेचा कित्ता गिरवलेला आहे. त्यामुळे बाबा बागेश्वर यांनी असले उद्योग इथे करू नयेत.

# निरोगी आरोग्यासाठी 'ब्रोकोली' आहे लाभदायक



**भा**जीमंडईत आजाकाल हिरवीगार 'ब्रोकोली' सर्वत्र उपलब्ध असते. ब्रोकोली दिसायला अगदी फ्लॉवरप्रमाणेच असते फक्त तिचा रंग हिरवा असतो. मात्र असं असलं तरी या ब्रोकोलीमध्ये अनेक आरोग्यदायी गुणधर्म दडलेले आहेत. यासाठीच ब्रोकोलीचा वापर नियमित आहारात करणं गरजेचे आहे. ब्रोकोलीत प्रोटिन्स, लोह, कॅल्शियम,फायबर्स, मॅग्नेशियम, फॉस्फरस, व्हिटॅमिन्स मुबलक प्रमाणात असतात. शिवाय तिच्याध्ये अँटिऑक्सिडंटचे प्रमाण अधिक असल्यामुळे आरोग्यासाठी ती अतिशय लाभदायक ठरते. ब्रोकोली फ्लॉवरच्या भाजीप्रमाणे शिजवून अथवा परतून खाण्यापेक्षा ती उकडून अथवा सॅलेडमधून खाल्लास चांगला फायदा मिळू शकतो. कारण अशा पद्धतीने खाण्याने ब्रोकोलीमधील पोषकतत्त्व शिजल्यावरदेखील टिकून राहतात.

### वजन कमी होण्यास मदत होते

ब्रोकोलीच्या भाजीत पाणी आणि फायबर्सचे प्रमाण अधिक असल्यामुळे तिच्या सेवनाने तुमचे वजन कमी होऊ शकते. वजन कमी करण्यासाठी उकडलेली ब्रोकोली सॅलेडमध्ये टाकून दोन्ही वेळच्या जेवणासोबत खा. अथवा मधल्या वेळेस ब्रोकोलीची स्मूदी खाण्यास काहीच हरकत नाही. यामुळे तुमच्या पोटात फायबर्स पुरेशा प्रमाणात जातील आणि तुम्हाला वारंवार भुक लागणार नाही. सहाजिकच ब्रोकोली खाण्याने तुमचे पोषण होईल शिवाय वजनदेखील नियंत्रणात राहण्यास मदत होईल.

### गर्भवती महिलांसाठी उत्तम

गरोदरपणात नेमका कोणता आहार घ्यावा याबाबत अनेक समज आहेत. मात्र या काळात गरोदर स्त्रीचे आणि तिच्या गभार्चे उत्तम पोषण होणे गरजेचे असते. ब्रोकोलीमधील पोषणतत्त्वे गर्भाच्या वाढीसाठी पोषक असतात. यामुळे त्यांच्या मेंदू आणि शारीरिक विकास होण्यास मदत होते.

### कर्करोगापासून बचाव होतो

बदलती जीवनशैली आणि व्यसनांचे वाढलेले प्रमाण यामुळे आजकाल कर्करोग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. जीवनशैलीत बदल आणि योग्य आहार यामुळे कर्करोगापासून बचाव होणे शक्य आहे. एका संशोधनानूसार आहारात नियमित ब्रोकोलीचा वापर केल्यामुळे कर्करोगापासून संरक्षण मिळू शकते. कर्करोगाच्या पेशींची वाढ थांबवण्यासाठी ब्रोकोली फायदेशीर आहे.

### पचनसंस्था सुधारते

ब्रोकोली या फळभाजीमध्ये फायबर्स भरपूर प्रमाणात असतात. नेहमीच्या जेवणात ब्रोकोलीचा वापर केल्यामुळे तुमच्या पचनसंस्थेवर चांगला परिणाम होतो. म्हणूनच जर तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर आहारात ब्रोकोलीचा वापर जरूर करा.

### डोळ्यांचे आरोग्य सुधारते

ब्रोकोलीमध्ये बीटी केरोटिन मुबलक प्रमाणात असते. ज्यामुळे तुमच्या डोळ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होऊ शकते. वयोमानानुसार होणारे मोतिबिंदू, काचबिंदू यापासून बचाव होण्यासाठी नियमित ब्रोकोली अवश्य खा.

### मधुमेह नियंत्रणात राहण्यास मदत

मधुमेहींसाठी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवणं हे मोठं आव्हानंच असतं. टाईप २ मधुमेह असणाऱ्या लोकांनी रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी नियमित ब्रोकोली खाल्लास चांगला फायदा होऊ शकतो.

### बोक्रोली खरेदी करताना कोणती काळजी घ्यावी ?

कोणतीही भाजी खरेदी करताना ती सावधपणे खरेदी करणं गरजेचं आहे. कारण आजकाल अनेक खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करून ते बाजारात विकले जातात. त्यामुळ ब्रोकोली खरेदी करताना काही गोष्टी नीट सावधपणे पाहाव्यात. ब्रोकोलीची भाजी खरेदी करताना तिचा कंद टणक, हिरवागार ( रंग एकसमान हिरवा असणं), ताजी आहे याची खात्री करून घ्या. ब्रोकोलीची भाजी बाजारातून विकत आणल्यावर हवाबंद पिशवीत टिकवून ठेवता येऊ शकते. मात्र शक्य असल्यास ती लवकर संपवावी. कारण भाजी शिळी झाल्यास तिच्यामधील पोषकतत्त्व कमी होत जातात. हवाबंद पिशवी अथवा डब्यात ब्रोकोली दोन ते तीन दिवस चांगली टिकते.

# जेवणानंतर कधीच करु नका या ५ चुका



**दु**पारी छान पोट भरुन जेवल्यानंतर आपल्याला अनेक गोष्टी कराव्याशा वाटतात. पण या अनेक गोष्टी ज्या तुम्ही करु इच्छिता त्या तुमच्या आरोग्याठी चांगल्या नाहीत. त्यामुळे दुपारी जेवल्यानंतर जर तुम्ही काही सर्वसाधारण चुका करत असाल तर मग तुम्ही या चुका करणं आताच थांबवा. जेवणानंतर तुम्ही नेमक्या कोणत्या ५ चुका करायला नको ते पाहुया.

**जेवणानंतर डुलकी काढणे -** दुपारी तुम्ही अगदी कुठेही असा जेवल्यानंतर प्रत्येकाच्याच डोळ्यासमोर झोपेची एक चादर येतेच. अशावेळी एक तरी डुलकी काढता यावी असे प्रत्येकाला वाटते. ऑफिसमध्ये नसल्यावर दुपारची झोप तर अजिबातच टाळता येत नाही. पण जर तुम्ही जेवणानंतर झोप काढत असाल तर असे अजिबात करुन नका. जेवणानंतर लगेचच डुलकी काढल्यामुळे अन्न पचत नाही. जर तुम्हाला अपचनाचा त्रास असेल तर मग तुम्ही अजिबात झोपायला नको कारण तुम्हाला हमखास अपचनाचा त्रास होण्याची शक्यता असते. शिवाय तुमच्या घशाशी सतत आंबट आंबट चव लागत राहते.

**फळ खाणं -** उत्तम आरोग्यासाठी फळ खाण्याचा सल्ला दिला जातो. पण तुम्ही कधीही फळ खात असाल तर त्याला काहीही अर्थ नाही. कारण जर तुम्ही जेवणानंतर फळ खात असाल तर मग ती फळं अजिबात पचत नाही. तुम्हाला फळ खायची असतील तर ती तुम्ही जेवणाआधी किमान तास-दोन तास आधी खायला हवीत. तरच त्या फळांचा फायदा तुम्हाला होऊ शकतो. त्यामुळे तुम्ही फळं खा. पण दोन्ही वेळांच्या जेवणानंतर तुम्ही ती फळं अजिबात खायला नको.

**चहा कॉफीचे सेवन -** अनेकांना जेवणानंतर चहा किंवा कॉफी पिण्याची सवय असते. पण जेवणानंतर तुम्ही लगेचच याचे सेवन करत असाल तर तुम्ही ते करणे आजच थांबवा. चहा- कॉफीच्या सेवनामुळे तुमच्या अन्नातील प्रोटीन शरीरात घट्ट होतात आणि ते पचण्यास अडथळा निर्माण करतात. असे झाल्यास काहींना ॲसिडीटीचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे जेवणाआधी एक तास आणि जेवणानंतर किमान एक तास चहा कॉफीचे सेवन करु नका.

**चालणे किंवा शतपावली करणे -** काहींना जेवल्यानंतर चालण्याची सवय असते. पण तुमची ही सवय तुमच्या आरोग्यासाठी घातक ठरु शकते. याचे कारण असे की, जेवणानंतर लगेचच तुम्ही चाललात की, तुमचे अन्न पचण्यास त्रास होऊ शकतो. त्यामुळे जेवल्यानंतर थोडा वेळ बसून मगच तुम्ही चाला. चालतानाही तुमचा वेग जास्त नको. तुम्ही अगदी हळुहळु फेरफटका मारा.

**जेवणानंतर आंघोळ करणे -** जेवणानंतर लगेचच आंघोळ करण्याची काहींना सवय असते. विशेषतः रात्रीच्यावेळी जेवणानंतर खूप जण आंघोळ करतात. तुम्ही जर असे करत असाल तर आताच तुम्ही हे थांवबा कारण जर तुम्ही रात्री जेवणानंतर आंघोळ करत असाल तर त्यामुळे तुमचे अन्न पचू शकत नाही. याचे कारण असे की, आंघोळीमुळे तुमच्या पोटाजवळील रक्तपुरवठा खंडीत होतो. ते इतर भांगांकडे गेल्यामुळे तुमचे अन्न पचण्यास अडथळा निर्माण होतो.

# 'कोल्हापूरी मसाला'



**'कोल्हापूरी मसाला'साठी लागणारा साहीत्यः**

- १ कप सुक्या लाल मिरच्या
- १/२ कप सुक्या खोबऱ्याचा किस
- २ टेस्पून तीळ
- १ टेस्पून धणे
- १ टेस्पून जिरे
- १ टेस्पून काळी मिरी
- १ टिस्पून मोहोरी
- १ टिस्पून मेथीदाणे
- २ तमालपत्र
- १ टिस्पून लवंग
- १ टिस्पून तेल
- १/४ टिस्पून जायफळपूड
- २ टेस्पून काश्मिरी लाल तिखट

**'कोल्हापूरी मसाला'साठी लागणारा साहीत्यः**

- कढईत वरील सर्व मसाले ['काश्मिरी लाल तिखट आणि जायफळ पूड' वगळून] एकत्र करावे. लाल तिखट आणि जायफळ पूड आपण शेवटी मसाला तयार झाल्यावर त्यात घालायचे आहे.
- मिक्स केलेल्या सर्व मसाल्यांना १ टिस्पून तेल हलकेच चोळून घ्यावे. मिडीयम हाय आचेवर हे सर्व मसाले भाजून घ्यावे. भाजताना कालथ्याने सतत ढवळावे.
- मिरचीच्या कडा थोड्या काळ्या होतील, मोहोरी तडतडेल, धणे-जिरे-तिळ थोडे ब्राऊन होईल. असे झाल्यावर मसाले भाजले गेलेत असे समजावे. तसेच मसाले भाजले गेल्याचा छानसा वासही येईल. मसाले खुप काळपट भाजू नयेत किंवा करपवू नयेत.
- भाजलेले मसाले लगेच दुर्सया ताटात पसरवून ठेवावेत. गार झाले कि मिक्समध्ये बारीक वाटावेत. तयार मसाल्यात जायफळ पूड आणि रंगासाठी २ टेस्पून काश्मिरी लाल तिखट घालावे.
- तयार मसाला घट्ट झाकणाच्या काचेच्या किंवा प्लास्टिकच्या बरणीत भरून कोरड्या जागी ठेवावा.

**टीपाः**

१) लाल तिखट मिरच्या वापराव्यात. मी १/२ कप तिखट लाल मिरच्या आणि १/२ कप काश्मिरी मिरच्या वापरल्या होत्या. काश्मिरी लाल मिरच्यांना फारसा तिखटपणा नसतो. पण रंग फार सुरेख येतो. म्हणून १ कप मिरच्या कशा प्रमाणात घ्यायच्या किंवा पूर्ण लाल तिखट मिरच्या घ्यायच्या ते आवडीनुसार ठरवावे.

२) मसाले पूर्ण गार होत नाहीत तोवर मिक्सरमध्ये बारीक करू नयेत. जर केल्यास मसाल्याला दमटपणा येतो आणि मसाला मोकळा रहात नाही.

# तुम्हाला माहित आहे का ? 'हे'आहेत 'मोसंबी'चे फायदे

**मो**संबी हे फळ मूळचे भारतीय नव्हे. मोझांबिक बेटाचे नावावरून याला मोसंबी हे नाव पडले असले तरी याचे मूळ स्थान चीन आहे. या फळाचा रस चवीला मधुर, पाच्य (पचावयास हलका) पण कफकारक असला तरी शक्तिवर्धक, भूक व तृषाशामक आहे. थोडी मिरपूड व मीठ लावून घेण्याने कफाचा प्रादुर्भाव होत नाही. काही वेळेस रस कोमट करून घेण्याचा वैद्य सल्ला देतात. दीर्घ आजारात शक्ती भरून येण्यासाठी तसेच जेव्हा पचनयंत्रणा कमकुवत झालेली असते; अशावेळी या रसाचा सातत्याने उपयोग केला जातो.

- रस घेण्यामुळे पोटातील आम्लता दूर होते, भूक लागते व पचनाच्या तक्रारी दूर होतात.
- शरीरात कोणत्याही कारणाने रक्तदोष निर्माण झाला, तर काही दिवस तरी नियमाने रस घ्यावा.
- बस, ट्रेन, बोट लागण्याची सवय असल्यास प्रवासात अधूनमधून साल काढून कापटी चोखत राहावे; त्रास जाणवत नाही.
- मोसंबीची साल सावलीत वाळवून त्याची मडक्यात घालून राख करावी. उलटी होत असल्यास अर्धा चमचा राख मधातून उलटी थांबेपर्यंत १/१ तासाचे अंतराने चाटवावी.
- कफ प्रकृतीचे व्यक्तींना शक्तिवर्धक म्हणून रस घेणे असल्यास गरम करून, ग्लासभर रसात २ चमचे आल्याचा रस टाकून घ्यावा, कफाचा प्रादुर्भाव होत नाही.
- फुलांपासून मोसंबीचे सुवासाचा अर्क काढून अत्तर तयार करण्यासाठी वापरतात व याला खूप मागणी असते.



# डायबेटिस नियंत्रणात राखण्यासाठी करा ही पाच योगासनं!

**भा**रतात मधुमेहाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. मधुमेहात शरीरातील साखरेचं प्रमाण वाढतं. शारीरिक मेहनत न करणं, बदलती जीवनशैली आणि खाण्या पिण्याच्या वेळा न पाळणं... अशा अनेक कारणांमुळे मधुमेह हा आजार होऊ शकतो. मधुमेह हा आजार पूर्णपणे कधी जात नाही. मात्र खाण्यावर नियंत्रण आणि गोळ्यांच्या मदतीने यावर नियंत्रण मिळवता येऊ शकते. याशिवाय योगच्या माध्यमातूनही मधुमेह नियंत्रणात ठेवता येतो.

- **धनुरासन -** या योगप्रकारात शरीराला धनुष्याप्रमाणे मोडायचं असतं. या आसनाला मधुमेहाच्या रुग्णांसाठी वरदान म्हटलं जातं. यामुळे ओटीपोटाचे स्नायू मजबूत होतात. जर तुम्हाला थकवा जाणवत असेल तर हे आसन तुमच्यासाठी फार फायदेशीर आहे.
- **चिमोत्तानासन-** या योगसाधनेत दोन्ही पायात अंतर ठेवून समोरच्या बाजूला झुकायचे असते. यामुळे पोटावर ताण तयार होतो. ज्यामुळए शरीराची पाचनक्रिया चांगली होते आणि मेंदू शांत होतो.
- **अर्ध्य मत्स्येंद्रासन-** या योगासनावेळी मणक्याचे हाड फिरते, ज्यामुळे पोटाचाही चांगला व्यायाम होतो. या योगासनावेळी फुफ्फुसांनाही भरपूर ऑक्सीजन मिळतो. फक्त मणक्याच्या हाडालाच नाही तर संपूर्ण शरीरातील रक्तप्रवाह ठीक होतो.
- **कपालभाती-** हे योगासन केल्याने आपल्या मज्जासंस्था आणि मेंदूचे तंतू पुनरुज्जीवित होतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे फार फायदेशीर आहे. यामुळे शरीरातील रक्तप्रवाह ठीक होतो आणि शरीरातील इन्सूलिन तयार होण्याची प्रक्रिया ठीक होते आणि मधुमेह नियंत्रणात राहतो.
- **सुप्त मत्स्येंद्रासन-** या योगासनामुळे शरीराचे अवयव सक्रिय होतात. या योगासनावेळी तुमच्या पोटाच्या भागावर ताण येतो. या आसनामुळे पचनक्रिया सुधारते आणि याचा मधुमेहाच्या रोगांना फायदा होतो.

**टीप-** या लेखात दिलेली माहिती आणि सुचना ही सर्वसामान्य माहितीवर आधारित आहे.



# सहस्त्ररश्मी बद्दल कृतज्ञताभाव

सूर्य आपल्याला केवळ प्रकाशच देतो असे नाही, तर आपण आहोत त्याला बऱ्याच अंशी सूर्य कारणीभूत आहे. म्हणूनच या सहस्त्ररश्मीबद्दल कृतज्ञताभाव त्याची पूजा करून व्यक्त केला पाहिजे. त्यासाठी रोज सूर्योदयापूर्वी स्नानादी कार्ये आटोपली पाहिजेत. सूर्योदय झाल्यानंतर त्या भास्कराच्या समोर नतमस्तक होऊन डोळे मिटून त्याची प्रार्थना करा. जे तत्व सूर्यात आहे, ते माझ्यातही आहे, असे म्हणून डोळे उघडा. त्यानंतर खालील मंत्र म्हणा.

ॐ मित्राय नमः। - ॐ रवये नमः। ॐ सूर्याय नमः। - ॐ भानवे नमः। ॐ खगाय नमः। - ॐ पुष्णे नमः। ॐ हिरण्यगर्भाय नमः। - ॐ मरिचये नमः। ॐ आदित्याय नमः। - ॐ सवित्रे नमः। ॐ अर्काय नमः। - ॐ भास्कराय नमः। ॐ श्री सवितृ सूर्यनारायणाय नमः।

अशा प्रकारे सूर्याची पूजा- अर्चना केल्याने बरेच लाभ होतात. त्याच्या कोवळ्या प्रकाशाच्या माध्यमातून डी जीवनसत्व आपल्याला मिळते. शिवाय त्याच्या पराक्रमी रूपाकडे पाहून आपल्यात चेतना संचारते. रोज सकाळी तांब्याच्या लोटीमध्ये शुद्ध पाणी घ्या. त्यानंतर सूर्याच्या समोर उभे राहून दोन्ही हातांनी लोट्याला उंच उचलून सूयार्ला अर्घ्य अर्पण करा. म्हणजे त्यातील पाणी काली सोडून द्या. अर्घ्याच्या पाण्यात लाल फुले, अक्षता, कुंकू हेही टाकावे. अर्घ्य वाहताना खालील मंत्र म्हणून संकल्प सोडावा.


एहि सूर्य! सहस्त्रांशो! तेजो राशे! जगत्पते!

अनुकम्प्यं मां भक्त्या गृहाणार्घ्य दिवाकर भावार्थ- हे सहस्त्रांशो, हे ते जो राशे, हे जगत्पते, माझ्यावर कृपा करा. मी श्रद्धापूर्वक अर्पण केलेले हे अर्घ्य स्वीकारा. त्याचप्रमाणे खालील मंत्रांमध्येही सूर्याला आवाहन केले आहे. या मंत्रामध्येही दिव्य शक्ती आहे.

ॐ आरोग्य प्रदायकाय सूर्याय नमः। ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय नमः। ॐ आदित्याय नमः। ॐ घ्रणि सूर्याय नमः।

अशा प्रकारे सूर्य नमस्कार व सूर्योपासनेद्वारे शरीराला निरोगी, सुखी व समृद्ध बनविता येते. त्यासाठी सूर्योपासना जरूरीची आहे.

# कडधान्यामुळे होतात विविध अनेक प्रकारचे आरोग्य लाभ



**क**डधान्ये आपल्या आहारात महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, आजच्या धकाधकीच्या काळात घरातूनच काय तर हॉटेलमधूनही कडधान्याची हकालपट्टी झाली आहे. यांच्या अभावामुळे मानवाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसत आहे. कडधान्ये जास्त शिजविल्यानंतरही त्याच्यातील पोषक द्रव्ये कायम राहतात. तसेच त्यात भरपूर जीवनसत्वेही असतात. जाणून घेऊया कडधान्याचे फायदे...

**तूरडाळ :** यात खनिज, कार्बोहायड्रेट, लोहयुक्त खनिज, कॅल्शियम यांचे योग्य प्रमाण असते. तूर डाळ पचण्यास सोपी जाते. लहान बाळांना तूरडाळीचे पाणी पिण्यास देतात. तसेच आजारी व्यक्तीस तूरडाळीची खिचडी खाण्यास देतात. मात्र, दमा व वाताचे आजार असणाऱ्या व्यक्तींना तूरडाळीपासून त्रास होतो.

**मूग :** शिजवलेल्या किंवा भिजवलेल्या मुगामध्ये भरपूर पोषक द्रव्ये असतात. ते मानवास आरोग्यासाठी फायद्याचे असातात. कोंब आलेल्या मुगामध्ये कॅल्शियम, लोहयुक्त खनिज, प्रोटीन, कार्बोहायड्रेट आणि व्हिटॅमिन्स यांचे प्रमाण अधिक असते. ताप व खोकला असलेल्याा व्यक्तीसाठी मूग लाभदायी आहे.

**हरभरे :** हरभरे व हरभऱ्याची डाळ आपल्या आरोग्यासोबतच सौंदर्यासाठीही उत्तम आहे. याात कार्बोहायड्रेट, प्रोटीन, कॅल्शियम, लोहयुक्त खनिज व व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. रक्तदाब, खोकला व कावीळ या आजारावर लाभदायी असून याच्या डाळीचे पीठ केस व त्वचेच्या सौंदयार्साठी गुणकारी असते.

**उडीद :** उडदाची डाळ शरीरासाठी शीत असते. मानवी आहारात तिचा उपयोग करतेवेळी शुद्ध तुपात हिंग टाकून त्याची वाफ द्यावी. यातही कार्बोहायड्रेट, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम व प्रोटीन भरपूर प्रमाणात आढळतात. मुळव्याध, दमा, पक्षाघात आदी आजार असलेल्यांनी त्यांच्या आहारात उडीद डाळीचा जास्त वापर केला पाहिजे.

**मटकी :** मटकी व त्याची डाळ कार्बोहायड्रेट, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम व प्रोटीनयुक्त असल्याने कृष्ठरोग व विषमज्वरनाशक असते.

**मसूर :** मसूर डाळीचा उपयोग रक्तशुद्धी तसेच रक्तवाढीसाठी होतो. जुलाब, खोकला आणि अपचन यावरही मसूरची डाळ लाभदायी असते.

# रक्तवाढीसह पित्तनाशक आहे, वातदोषी कमी करते सीताफळ



**सी**ताफळ एक सीझनल फळ आहे. सध्या बाजारात सीताफळे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. हंगामी काळात ते फळ खाल्ल्याने आरोग्यासाठी फायदेशीर असते. सीताफळ हे अतिशय उपयुक्त असे फळ आहे. सीताफळ खाण्यासाठी जितके स्वादिष्ट लागते तितकेच ते आरोग्यासाठी उत्तम असते. सीताफळ हे पित्तनाशक, पौष्टिक, रक्तवर्धक, वातदोष कमी करणारे फळ आहे. काही जणांना पिकलेल्या सीताफळाचा गर खायला आवडतो तर काही जणांना त्याच्यापासून तयार केलेले मिल्कशेक आणि बासुंदी, तर जाणून घ्या सीताफळ आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे.

**हृदयरोगापासून बचाव -** आजकालच्या दगदगीच्या जीवनशैलीमुळे हृदयावरील ताण दिवसेंदिवस वाढत चालला आहे. काम आणि चिंता यामुळे हृदयाचे आरोग्य बिघडण्याची शक्यता अधिक असते. हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी हृदयातील मांसपेशींना मॅग्नेशियमची गरज असते. सीताफळात भरपूर प्रमाणात मॅग्नेशियम असते. ज्यामुळे हृदयविकारापासून दूर राहण्यासाठी सीताफळ खाणे तुमच्यासाठी नक्कीच फायदेशीर ठरू शकते.

**अशक्तपणा कमी होतो -** आजकाल योग्य पोषण न झाल्यामुळे आणि रक्ताचे प्रमाण कमी असल्यास ॲनिमियाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ज्यामुळे सतत थकवा आणि चक्कर अशी लक्षणे जाणवतात. पुरुषांपेक्षा महिलांना या समस्येचा त्रास अधिक होत असते. मात्र सीताफळात लोह भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे सीताफळ खाण्यामुळे शरीरातील लोहची कमतरता भरून निघू शकते.

**दम्याचा त्रास कमी होतो -** ज्यांना अस्थमा अथवा दम्याचा त्रास असेल त्यांनी सीताफळ खाल्ल्यास चांगला फायदा होऊ शकतो. सीताफळमधील व्हिटॅमिन बी ६ श्वसनमार्गातील सूज कमी करण्यास मदत करते. ज्यामुळे इनफेक्शनचा त्रास कमी होतो आणि दम्यापासून नक्कीच आराम मिळू शकतो.

**सुंदर दिसण्यासाठी खा -** सीताफळामुळे त्वचेचे आरोग्य चांगले राहू शकते. कारण सीताफळात व्हिटॅमिन ए आणि अँटिऑक्सिडंट भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे त्वचेच्या पेशींचे कार्य सुरळीत चालते आणि त्वचा चमकदार आणि फ्रेश दिसते. शिवाय नियमित सीताफळ खाण्यामुळे चेहऱ्यावरील एजिंगच्या खुणा कमी प्रमाणात दिसतात. चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी होतात.

**गर्भधारणेसाठी वरदान -** गर्भधारणेत अपयश आल्यामुळे अनेक जोडप्यांचे आई-बाबा होण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. वास्तविक गर्भधारणेसाठी स्त्रीच्या शरीराला फॉलिक ॲसिडची गरज असते. जर फेलोपियन ट्यूबमध्ये दोष असतील तर ते फॉलिक ॲसिडमुळे कमी होतात. सीताफळात भरपूर प्रमाणात फॉलिक ॲसिड असते. ज्यामुळे गर्भधारणेच्या प्रक्रियेला नक्कीच चालना मिळू शकते. यासाठी आई होण्यासाठी प्रयत्न करत असाल तर सीताफळ खायला काहीच हरकत नाही. मात्र लक्षात ठेवा गर्भधारणेनंतर अती प्रमाणात सीताफळ खाल्ल्यास गर्भपाताचा त्रास होण्याची शक्यता असते.

# स्वमग्नांचे मनोबल वाढवणे गरजेचे



**अ**करा वर्षांच्या मिहीरचे वागणे अगदी वेगळे असायचे. आपल्याच विश्वात तो रमायचा. सभोवतालाविषयी त्याला काहीही रुची नव्हती. केव्हाही काहीही पुटपुटणे आणि ओरडणे, उड्या मारणे सुरू असायचे. मिहीर दिसायला लोभस. अंगकाठी मजबूत. डोळे तीक्ष्ण. एकूणात, ॲक्टिव्ह; पण वागणूक विशेष मुलासारखी. दुसरीनंतर शिक्षण सुटले. त्याला विशेष शाळेत टाकले. तिथेही त्याच्या वागणुकीत बदल नाही. मिहीरला कुठे बाहेर नेणे म्हणजे वैताग आणि घरी ठेवले, तर गोंधळ. मूठमूठभर तिखट, मसालेपूड तो खात बसायचा. त्याचे हे त्रास पालकांच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेले. अखेरीस, मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेतला गेला. जगात मिहीरसारखी दोन ते तीन टक्के मुले आहेत. या अवस्थेला 'स्वमग्नता' (ऑटिझम) म्हणतात. विकासपद्धतीत बिघाड झाल्याने अशा मुलांच्या मेंदूची विशेष रचना तयार होते. साधारण मुलांहून ती जास्त गतिमान असतात. आईच्या स्पर्शाचीही ओळख नसते, तेव्हा मेंदूचा विकास होताना त्यात किती तीव्र बिघाड झाले हे लक्षात येते. असे का होते, हे कोडे अद्याप उलगडलेले नाही. जन्माच्या वेळेस स्वमग्न मुलांच्या मेंदूचा आकार हा सामान्य मुलांच्या मेंदूपेक्षा जास्त असतो. अन्य काही त्रुटी नसतात. स्वमग्न मुले विशेष नसतात. त्यांच्यात काही विलक्षण प्रतिभा असतात. मिहीरचेच एक उदाहरण. एकदा तो पालकांसोबत संगीत मैफलीस गेला. अचानक स्वतःहून व्यासपीठावर गेला आणि तबला वाजवू लागला. अगदी एखाद्या निष्णात तबलावादकासारखा! साऱ्यांना आश्चर्य वाटले; पण ते तेवढ्यापुरते. नंतर कधी त्याने तबल्याकडे पाहिलेही नाही. माझ्याकडे येणाऱ्या अशा मुलांमध्ये अतिंद्रिय क्षमता दिसल्या. या मुलांचे स्पर्श अर्थपूर्ण असतात. त्यांनी इतरांच्या अंगभागांना स्पर्श केल्यास तिथे काही दुखणे वा आजार आहे, हे समजावे. मिहीरने एका स्त्रीच्या स्तनांना स्पर्श केला. तिने माझ्याकडे तक्रार केली. मी तिला 'मॅमोग्राफी'ची तपासणी सांगितली. तपासणीत पहिल्या टप्प्यावरचा कर्करोग आढळला. काही मुले अतिविशिष्ट बौद्धिक क्षमतेची असतात. 'नासा'त कम्प्युटर कोड्सचे अर्थ लावण्याच्या कामी त्यांची मदत घेतली जाते. स्वमग्न मुलांचे वागणे औषधांनी बदलते का, ती हळूहळू स्वावलंबी होतात का, याविषयी पुढच्या भागात माहिती घेऊ.

# शेती,पर्यटन आणि वाहतूक क्षेत्र संकटात, कोकणच्या अर्थव्यवस्थेचा पाया हादरला

## महाराष्ट्रातील जगप्रसिद्ध जिल्हा मोठ्या संकटात...

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

कोकण म्हणजे स्वर्ग. पर्यटनामुळे रत्नागिरी जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय जिल्हा आहे. याशिवाय रत्न ागिकीचा हापूस आंबा जगप्रसिद्ध आहे. निळाशार समुद्र आणि हापूसच्या सुगंधाने जगभर ओळखले जाणारे कोकण सध्या एका भीषण आर्थिक चक्रव्यूहात अडकले आहे. एकीकडे आखाती युद्धामुळे निर्माण झालेली गॅस टंचाई आणि दुसरीकडे 37-41 अंशांच्या पार गेलेला पारा,अशा दुहेरी संकटाने कोकणच्या अर्थव्यवस्थेचा पायाच हादरवून टाकला आहे.शेती, पर्यटन आणि वाहतूक ही तिन्ही प्रमुख क्षेत्रे कोलमडली असून कोकणची अर्थव्यवस्था सध्या 'व्हेंटिलेटर'वर असल्याचे चित्र दिसत आहे.

**पर्यटनाला घरघर, हॉटेल व्यवसायावर संकट**

कोकणच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाचा वाटा सर्वाधिक आहे. मात्र,आखाती युद्धामुळे उद्भवलेल्या गॅस टंचाईचा मोठा फटका हॉटेल उद्योगाला बसला आहे.जवळपास ५० टक्के हॉटेल व्यवसायाला यामुळे घरघर लागली असून मेनू कार्डमधील अनेक पदार्थ गायब झाले आहेत. त्यातच वाढत्या




उष्णतेमुळे पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यांकडे पाठ फिरवल्याने ऐन हंगामात शुकशुकाट पसरला आहे.परिणामी, कोट्यवधींच्या उलाढालीला मोठा ब्रेक लागला आहे.

**वाहतूकदारांची चाके रुतली**

पर्यटकांची संख्या घटल्याचा थेट परिणाम स्थानिक वाहतूक व्यवसायावर झाला आहे. तासनतास वाट पाहूनही रिक्षा आणि टॅक्सी चालकांना ग्राहक मिळेनासे झाले आहेत. गाड्यांचे हप्ते कसे भरायचे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, या चिंतेत व्यावसायिक अडकले आहेत.

**आंबा-काजूचा मोहर करपला**

कोकणच्या अर्थव्यवस्थेची धुरा आंबा आणि काजू पिकावर असते. मात्र, निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा परिस्थिती गंभीर आहे. ४१ अंश सेल्सिअस तापमानामुळे आंबा आणि काजूचा मोहर करपून गेला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा केवळ २० टक्केच पीक हाती लागल्याने बागायतदार हवालदिल झाले आहेत. अवकाळी पाऊस आणि कडक उन्हाळा यांनी शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे.

**मदतीचा 'ऑक्सिजन' मिळणार का?**

युद्ध आणि निसगार्ची वक्रदृष्टी या दुहेरी कात्रीत कोकणचा आर्थिक कणा पार मोडून पडला आहे. संकटात सापडलेल्या या पर्यटन आणि कृषी प्रधान प्रदेशाला आता सरकार मदतीचा 'ऑक्सिजन' देऊन पुन्हा उभे करणार का, हाच खरा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे.

## नाशिकमधील धीरेंद्र शास्त्रींच्या कार्यक्रमावर टांगती तलवार...

**नाशिक :** धीरेंद्रकृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर धाम बाबा यांचा आज २ मे रोजी शहराजवळील गोवर्धन शिवारात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मात्र या कार्यक्रमावर टांगती तलवार आहे. कारण यासाठी अंनिसकडून विरोध दर्शवण्यात आला आहे. चमत्काराचे दावे करुन अंधश्रद्धांना खतपाणी घालणाऱ्या आणि महाराष्ट्रातील संत व महापुरुषांविषयी वारंवार अपशब्द वापरणाऱ्या या बाबाचा कार्यक्रम रद्द करावा, अशी मागणी आता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच धीरेंद्र शास्त्रींनी जर चमत्कार सिध्द केला तर २१ लाखांचे रोख पारितोषिक देण्यात येईल, असे आव्हान धीरेंद्र शास्त्री यांना करण्यात आले आहे.

**अंनिसचे आव्हान काय?**

धीरेंद्र शास्त्री यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अटी- शर्ती,नियम पाळून कोणत्याही शासकीय इमारतीच्या खोलीमध्ये त्या विषयांचे तज्ज्ञ, शासकीय अधिकारी, पोलीस, पत्रकार आणि त्यांचे व संघटनेचे मोजके पदाधिकारी यांच्या समक्ष आधुनिक विज्ञानाच्या कसोट्यांवर दैवी चमत्कारिक दावे सिद्ध करावेत. त्याशिवाय, अंनिसने दिलेल्या १० व्यक्तींच्या मनातील प्रश्न ओळखावेत, त्यांचे नाव , गाव व पत्ता सांगावा. असे त्यांनी करून दाखविल्यास चमत्कार सिद्धीसाठी महाराष्ट्र अंनिसचे २१ लाखांचे पारितोषिक त्यांना मिळेल.

**कार्यक्रम रद्द करण्याची मागणी**

अंधश्रद्धांना खतपाली घालणाऱ्या आणि महापुरुषांच्या आणि संतांच्या बद्दल अवमानकारक शब्द वापरणाऱ्या धीरेंद्रकृष्ण शास्त्रीचा नाशिकमध्ये होणारा कार्यक्रम रद्द करावा अशी मागणी अंनिसने केली आहे. कार्यक्रम रद्द न झाल्यास अंनिस समविचारी संघटना लोकशाही मार्गाने आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे.

# मिसिंग लिंकवर वाहन थांबवून फोटो, सेल्फी काढल्यास भरावा लागणार दंड

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई-पुणे मार्गावरील मिसिंग लिंकवर थांबणे, फोटो आणि सेल्फी काढणे पडणार महागात. सुरू होऊन अवघ्या दोन दिवसांत मुंबई-पुणे मिसिंग लिंकवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांची उत्सुकता नागरिक आवरू शकत नाहीत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर काही प्रवासी सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी वाहनं थांबवत असल्याचं समोर आलं आहे. मात्र हा प्रकार आता प्रवाशांना महागात पडणार असून मार्गावर असे वर्तन करणाऱ्यांवर पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाणार आहे. मिसिंग लिंकवर फोटो किंवा सेल्फीसाठी थांबल्यास प्रवाशांना आर्थिक दंड लागू शकतो, तसेच त्यांच्यावर गुन्हा देखील दाखल करण्यात येऊ शकतो. त्यामुळे या कारवाईला सामोरं जायचं नसेल तर मिसिंग लिंकवरुन न थांबता सुखकर प्रवास करावा, असं आवाहन महामार्ग पोलिसांनी केलं आहे. मिसिंग लिंकवर वाहने 100 ते 120 किमी प्रतितास वेगाने धावत असतात. अशा परिस्थितीत मध्येच थांबून फोटो काढणं हे अत्यंत धोकादायक ठरत आहे. त्यामुळेच पोलिसांनी अशा प्रकारांवर



बंदी घालत दंडात्मक कारवाईला सुरुवात केली आहे.

मुंबई-पुणे मार्गावरील मिसिंग लिंक हा प्रकल्प विशेषतः घाटातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी उभारण्यात आला आहे. अशा ठिकाणी गाड्या थांबवणे म्हणजे स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणे असे ठरत आहे. पोलिस प्रशासनाने या संबंधित स्पष्ट इशारा सुद्धा दिला आहे. त्या अनुषंगाने यापुढे मिसिंग लिंकवर थांबून सेल्फी किंवा फोटो काढणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल केला जाईल. पोलिसांकडून केवळ दंडच नव्हे तर गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हेही नोंदवले जातील अशी माहिती पोलिस प्रशासनाद्वारे देण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांत अशा घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे.

तसेच कारवाई टाळायची असेल तर मिसिंग लिंकवर कुठेही न थांबता प्रवास करा, असे आवाहन महामार्ग पोलिसांनी केला आहे. द्रुतगती मार्गावरील हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अलीकडेच सुरू झाला आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वळणं आणि कोंडी टाळून प्रवासाचा वेळ सुमारे 30 मिनिटांनी कमी झाला आहे. 1 मे रोजी, महाराष्ट्र दिनाच्या निमित्त या प्रकल्पाचं उद्घाटन करण्यात आले. सुरुवातीला एक मार्ग सुरू करण्यात आला होता, तर आता दोन्ही बाजूंची वाहतूक सुरू झाली आहे. मिसिंग लिंक सुरू झाल्यापासून वाहतूक कोंडी आणि अपघातांमध्ये लक्षणीय घट झाल्याचा दावा यंत्रणांनी केला आहे. पूर्वी दररोज 10 ते 15 अपघात किंवा कोंडीबाबत कॉल येत होते, मात्र आता एकही कॉल नियंत्रण कक्षाला आलेला नाही. अशात मिसिंग लिंकमुळे नागरिकांचा प्रवस सुखमय आणि सहजपणे होईल. मात्र मुंबई-पुणे मिसिंग लिंकवरून प्रवासादरम्यान गाडी थांबवणे, रील आणि फोटो काढणे टाळावे असे प्रशासनाचे आव्हान.

# आता हजेरीपत्रक आणि गुणपत्रिकेवर आईचं नाव अनिवार्य

## सर्व शाळांमध्ये एकच नियम लागू

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, येत्या शैक्षणिक वषार्पासून विद्यार्थ्यांच्या नावात आईचे नाव अनिवार्य करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र च्या या निर्णयामुळे शासकीय, अनुदानित तसेच खासगी सर्व शाळांमध्ये एकसमान नियम लागू होणार आहे.

**कोणत्या कागदपत्रांवर दिसणार आईचे नाव?**

विद्यार्थ्यांच्या हजेरीपत्रक, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश-निर्गम नोंदी तसेच इतर सर्व शालेय कागदपत्रांवर आईचे नाव अनिवार्यपणे नमूद केले जाणार आहे.

**विशेष प्रकरणांसाठी तरतूद** : विभक्त किंवा घटस्फोटित पालक, सिंगल पॅरेंट, तसेच दत्तक मुलांच्या बाबतीत संबंधित परिस्थितीनुसार योग्य नोंद करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा प्रकरणांत विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शाळांना लवचिकता ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**अमलबजावणी कशी होणार?**

शाळांना त्यांच्या विद्यमान नोंदींमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिल्या जाणार आहेत. नव्या प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा नियम तात्काळ लागू होईल, तर जुन्या विद्यार्थ्यांच्या नोंदी टप्प्याटप्प्याने अद्ययावत केल्या जातील. या निर्णयामुळे शैक्षणिक क्षेत्रात एक सकारात्मक सामाजिक संदेश जाणार असून, विद्यार्थ्यांच्या ओळखीत आईच्या भूमिकेला अधिक मान्यता मिळणार आहे.



नव्या नियमांनुसार, विद्यार्थ्यांच्या अधिकृत नोंदींमध्ये आता आईचे नाव प्रथम, त्यानंतर वडिलांचे नाव आणि शेवटी आडनाव असा क्रम निश्चित करण्यात आला आहे. हा बदल तत्काळ प्रभावाने लागू करण्यात येणार असून, शाळांना त्यानुसार नोंदी अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामागील मुख्य उद्देश म्हणजे आईच्या योगदानाला योग्य सन्मान देणे, लिंग समानतेला प्रोत्साहन देणे आणि समाजात समतोल दृष्टिकोन निर्माण करणे. अनेक वर्षांपासून अधिकृत कागदपत्रांमध्ये वडिलांच्या नावाला प्राधान्य दिले जात होते, त्यात आता बदल करण्यात आला आहे.

# मैत्री, शीरखूर्मा आणि नशीले औषधं...

## टीसीएस लैंगिक अत्याचाराप्रकरणात सर्वात धक्कादायक खुलासा

**■नाशिक। प्रतिनिधी,**

टीसीएस कंपनीतील एका विशिष्ट धार्मिक गटाकडून महिलांचे लैंगिक शोषण आणि धर्मांतरणाच्या प्रकरणाने देश हादरला. टीसीएस सारख्या बहुराष्ट्रीय मानांकित कंपनीतील याप्रकाराविरोधात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या. प्रकरणातील एक फरार आरोपी निदा खान ही अजूनही यंत्रणांना गुंगारा देत आहे. तिचा अटकपूर्व जामीन फेटाळून न्यायालयाने दणका दिला. याप्रकरणातील चार आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनाववली. या प्रकरणातील आरोपींचे दिल्ली बॉम्बस्फोटातील दहशतवाद्यांशी कनेक्शन असल्याचे समोर येत असतानाच अजून एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे.

याप्रकरणातील चार आरोपींना आरोपींना 5 मे पर्यंत पोलीस कोठडी



देण्यात आली आहे. या कोठडीत मांसाहारासह गुंगीकारक आणि मादक पदार्थ सेवन करण्यासाठी दिल्याचा पोलीस तपास करणार आहेत. या कोठडीत आरोपी काय कबुलीजबाब देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोपी कंपनीच्या कॅन्टीनमध्ये हिंदू देवी-देवतांबद्दल आक्षेपार्हय वक्तव्य करत असत. तर कंपनीच्या ग्रुपवर अश्लिल शेरेबाजी करत असल्याचे चॅटिंगमधून समोर आले आहे. इतकेच नाही तर कंपनीकडून विशेष धार्मिक सूट मिळाल्याचा गैरफायदाही त्यांनी घेतल्याचे धर्मांतरणाच्या प्रयत्नातून समोर आले आहे.

नाशिक येथील टीसीएस प्रकरणात पीडितांना गुंगीकरकर औषध दिल्याचा दाट संशय यंत्रणांना आहे. त्या अनुषंगाने तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, शीरखुमार्सारख्या गोड पदाथार्तून या पीडितांना आरोपींनी नशेचा पदार्थ दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. मैत्री झाल्यानंतर या महिलांना शीरखूर्मा देण्यात आला. त्यात नशेचे पदार्थ असल्याचा दावा करण्यात येत आहे. या खुलाशाने आता खळबळ उडाली आहे. लैंगिक शोषण करण्यासाठी पीडितांना नशेचा पदार्थ दिला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. लैंगिक शोषण करण्यासाठी पीडित महिलांना कामूक करण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जात होता. पीडित महिलांना मादक पदार्थ खाऊ घालतं लैंगिक अत्याचार केल्याचा संशय आहे. नाशिक पोलीस आता या अँगलने तपास करत आहेत.

**आरोपी निदा खान हीला मोठा झटका, कोटार्ने फेटाळला अटकपूर्व जामीन**

नाशिकच्या बहुचर्चित टीसीएस प्रकरणात नाशिक रोड न्यायालयाने आरोपी निदा खान हीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. कोटार्ने दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर हा निर्णय दिला आहे. सरकारी पक्षाने आरोप केला की पीडीतेला धार्मिक रितीरिवाजाकरीता प्रभावित केले गेले. तिचे नाव बदलले गेले आणि त्याची कागदपत्रे आरोपीकडे होती. या प्रकरणाच्या तपासासाठी आरोपी निदा खान हीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला जाणे ही बाब महत्वाची म्हटली जात आहे. कोटार्ने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आपला निर्णय राखून ठेवला आणि आज हा निकाल सुनावला. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने वकील अजय मिसर हे न्यायालयात हजर होते. तर आरोपींच्या वतीने वकील राहुल कासलीवाल यांनी युक्तीवाद केला. २९ एप्रिल रोजी या याचिकेवर बंद कक्षात सुनावणी झाली. त्यावेळी विशेष तपास पथकाच्या वतीने सहायक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांनी तपास अधिकारी म्हणून आपली बाजू मांडत जामिनाला विरोध केला. या आधी १८ एप्रिल रोजी देखील आरोपीच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली होती. ज्यात बचाव पक्षाने त्यांची बाजू सविस्तरपणे मांडली. त्यानंतर तपास पथकांनी सादर केलेल्या पुरावे आणि दस्ताएवजांवर न्यायालयाने गंभीरपणे विचार केला.

# नाशिकच्या महिला शिक्षकेला सुरतमध्ये डीआरआय च्या अधिकाऱ्यांनी घेतलं ताब्यात

## तब्बल 'एवढ्या' कोटींचे ड्रग्ज हस्तगत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) सुरतमध्ये मोठी कारवाई केली आहे. 'डीआरआय'ने दिल्लीतून मुंबईला येणाऱ्या एका महिलेला अटक केली आहे. संबंधित महिलेकडून तब्बल २५ कोटी रूपयांचे मेथॅम्फेटामाइन ड्रग्ज ताब्यात घेतले आहे. ही महिला शिकवणी चालक म्हणून काम करत असे. पण, ती छुप्या पद्धतीने ड्रग्ज सप्लायचे काम करत होती. 'डीआरआय'च्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार त्यांनी सुरत रेल्वे स्टेशनवर सापळा लावला होता. शुक्रवारी हरजत निजामुद्दीन ते दादर, ही रेल्वे प्लॅटफॉर्मवर आली. तेव्हा अधिकारी रेल्वेच्या बी ७ नंबरच्या डब्यात शिरले. तिथे आसन क्रमांक १२ वर बसलेल्या महिलेला अधिकाऱ्यांनी घेरलं. प्राथमिक तपासानंतर महिलेला ताब्यात घेण्यात आलं. तिथेच तिच्याकडे असलेल्या वस्तूंची तपासणी सुरू केली.

तपासादरम्यान महिलेजवळ असलेल्या ट्रॉली बॅगेत काळ्या चिकपट्टीनं बांधण्यात आलेले सात पॅकेट जप्त करण्यात आले. त्यासह बूट आणि शर्टचेही दोन बॉक्स



मिळाले. ज्यात ड्रग्ज लपवण्यात आले होते. अधिकाऱ्यांनी पाठीवर अडकवण्यात येणाऱ्या बॅगचीही तपासणी केली. यात संपूर्ण तपासात मेथॅम्फेटामाइन ड्रग्जचे एकूण ९ पॅकेट जप्त करण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या महिलेचं नाव मल्लिका चिगरे ( वय, ४५ रा. नाशिक ) असे आहे. अटकेनंतर महिलेला सुरतच्या जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत तब्बल २५ कोटी रूपयांहून अधिक आहे. तपासात हेही समोर आले की, अटक करण्यात आलेल्या महिलेला दिल्लीतील हजरत निजामुद्दीन रेल्वे स्टेशनवर एका अज्ञात व्यक्तीने ड्रग्ज सप्लायसाठी दिले होते. हे ड्रग्ज मुंबईच्या पुढे पोहोचवण्यात येणार होते. याप्रकरणात आणखी कुणा-कुणाचा समावेश आहे, याचा 'डीआरआय'कडून तपास केला जात आहे.

# विष, औषध की कटकारस्थान?

## कुटुंबाचे मोबाईल फोन तपासणीच्या कक्षेत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

काही दिवसांपूर्वीच पायधुनी परिसरात एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा अचानक झालेला मृत्यू यामुळे संपूर्ण मुंबई शहर हादरून गेले आहे. सुरुवातीला, हे प्रकरण केवळ 'अन्नातून विषबाधेचे' असावे असे मानले जात होते. मात्र, जसजसा तपास पुढे सरकत आहे, तसतसे या प्रकरणाचे स्वरूप नाट्यमयरीत्या बदलताना दिसत आहे. हे प्रकरण आता केवळ एखादा साधा अपघात नसून, त्यामागे एखादे मोठे कटकारस्थान असावे, या दिशेने निर्देश करत आहे.

मृत व्यक्तींच्या शवविच्छेदन दरम्यान डॉक्टरांना जे निष्कर्ष आढळले, त्यामुळे सर्वजण अवाक झाले आहेत. शवविच्छेदन अहवालानुसार, मृत व्यक्तींचे अंतर्गत अवयव नैसर्गिक किंवा सामान्य स्थितीत नव्हते, उलट ते विचित्ररित्या हिरव्या रंगाचे झाल्याचे आढळून आले. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची घटना अत्यंत दुर्मिळ आणि असामान्य मानली जाते. शिवाय, कुटुंबातील एका सदस्याच्या शरीरात ह्यमॉर्फिनह्चे अंश आढळून आले आहेत. मॉर्फिन हे एक अत्यंत प्रभावी वेदनाशामक आणि अंमली पदार्थ आहे. नेमक्या याच शोधामुळे हे संपूर्ण प्रकरण आता गूढतेच्या गर्तेत लोटले गेले आहे. त्यामुळे मॉर्फिन किंवा इतर एखादा विषारी पदार्थ त्यांच्या अन्नात आणि पेयात नेमके कसे मिसळला गेले? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

सदर घटना 25 एप्रिलच्या रात्री घडली. त्यावेळी घरात कुटुंबाचे एकूण नऊ सदस्य उपस्थित होते आणि रात्री साधारण 10.30 वाजता सर्वांनी एकत्र जेवण केले. त्यावेळी सर्व काही अगदी सामान्य वाटत होते. मात्र, पहाटे साधारण 1.30 वाजता कुटुंबातील चार सदस्यांनी पुन्हा एकदा बियाणी आणि कलिंगडाचे



सेवन केले. नेमक्या याच टप्प्यावर परिस्थितीने अत्यंत गंभीर वळण घेतले. पहाटे 5 वाजण्याच्या सुमारास या चारही व्यक्तींची प्रकृती अचानक बिघडू लागली. त्यांना तीव्र उलट्या होऊ लागल्या, प्रचंड अशक्तपणा जाणवू लागला आणि त्यांचे शरीर पूर्णपणे निकामी झाले. त्यामुळे घाईगडबडीत सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांना त्यांना वाचवण्यात यश आले नाही.

डॉक्टरांच्या निरीक्षणानुसार, अन्नातून होणाऱ्या साध्या विषबाधेच्या प्रकरणांमध्ये रुग्णाची प्रकृती खालावण्यासाठी आणि गंभीर होण्यासाठी साधारणपणे काही कालावधी लागतो. मात्र, या घटनेमध्ये चारही जणांचा ज्या वेगाने मृत्यू झाला आहे, तो वेग अत्यंत असामान्य मानला जात आहे. नेमक्या याच कारणामुळे, आता या प्रकरणाच्या तपासाची दिशा बदलली असून त्यामध्ये 'विषप्रयोग' किंवा एखाद्या 'रासायनिक पदार्थाचा वापर' केला गेला असावा, या शक्यतांवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. पोलीस आता या प्रकरणाचा सर्व संभाव्य बाजूने तपास करत आहे. या भीषण घटनेमागे कोणतीही वैयक्तिक शत्रुत्व, आर्थिक वाद किंवा अन्य कोणताही हेतू दडलेला आहे का? हे शोधून काढण्यासाठी कुटुंबाचे मोबाईल फोन तपासले जात आहेत, कॉल रेकॉर्ड्सची कसून छाननी केली जात आहे आणि बँक खात्यांचीही तपासणी केली जात आहे.

या घटनेचे पडसाद आता बाजारातही उमटू लागले आहेत. या प्रकरणामध्ये बियाणीसोबतच कलिंगडाचाही संबंध जोडला गेल्यामुळे, जनमानसात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आशियातील सर्वात मोठ्या घाऊक बाजारपेठांपैकी एक मानल्या जाणाऱ्या नवी मुंबईतील अढटउ बाजारपेठेत कलिंगडाच्या विक्रीत अचानक मोठी घट झाली आहे. उन्हाळ्याच्या हंगामात कलिंगडाला सहसा मोठी मागणी असते, मात्र आता लोकांनी कलिंगड खरेदी करण्यास संकोच वाटू लागला आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, कलिंगडाचे घाऊक दर घसरून केवळ 5 ते 7 रुपये प्रति किलोपर्यंत खाली आले आहेत. यापूर्वी, याच कलिंगडांची घाऊक बाजारात 10 ते 35 रुपये प्रति किलो दराने विक्री होत असे, तर किरकोळ दुकानांमध्ये त्यांना 30 ते 100 रुपये प्रति किलोपर्यंतचा भाव मिळत असे. पण भीतीपोटी व्यापाऱ्यांना आता आपला साठा अत्यंत कमी दरात विकताना दिसत आहेत.

दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासनाने देखील आपला तपास अधिक तीव्र केला आहे. एका पथकाने संबंधित निवासस्थानाच्या स्वयंपाकघरातून बियाणी, कलिंगड, पाणी, तांदूळ, चिकन, मसाले आणि खजूर यांसह एकूण 11 वेगवेगळ्या प्रकारच्या नमुन्यांचे संकलन केले आहे. प्राथमिक तपासात, जिवाणूंच्या संसगार्मुळे (बॅक्टेरियल कंटॅमिनेशन) अन्नातून विषबाधा झाल्याचे कोणतेही संकेत आढळले नाहीत. यामुळे, अन्नामध्ये जाणीवपूर्वक एखादा बाह्य पदार्थ मिसळला गेला असावा, या संशयाला अधिकच बळकटी मिळाली आहे.

# ड्रग्ज विक्रीचे पैसे गर्लफ्रेंडच्या खात्यात! नेस्को प्रकरणी मुख्य आरोपी अटकेत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गोरेगावच्या नेस्को संकुलात आयोजित एका हाय-प्रोफाईल म्युझिक कॉन्सर्टमध्ये ड्रग्जच्या अतिसेवनामुळे दोन तरुण एमबीए विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता, या प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले होते. या प्रकरणाच्या तपासात मुंबई पोलिसांनी आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि धक्कादायक खुलासा केला आहे. या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा मुख्य सूत्रधार ड्रग्ज विक्रीतून मिळणारा काळा पैसा पांढरा करण्यासाठी आणि पोलिसांच्या नजरेतून वाचण्यासाठी एका अनोख्या शक्कलचा वापर करत होता. आपल्या प्रेयसीच्या




नावावर असलेले बँक खाते आणि तिचा वैयक्तिक पेमेंट स्कॅनर वापरून तो ड्रग्जच्या पैशांची वसुली करत असल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी या तरुणीच्या बँक खात्यातून 50 लाख रुपयांची बेहिशोबी रक्कम जप्त केली असून, या ह्यडिजिटल मनी ट्रेलह्मुळे या रॅकेटचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याचा पदार्फाश झाला आहे.

**मुख्य सूत्रधार विमानतळावरून गजाआड**

या संपूर्ण रॅकेटचा मास्टरमाईंड महेश हिरो खेमलानी उर्फ मार्क (44) याला पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. 11 एप्रिल रोजी नेस्कोमध्ये आयोजित '99999999 टेक्नो कॉन्सर्ट' दरम्यान ज्या दोन एमबीए विद्यार्थ्यांचा अतिसेवनामुळे मृत्यू झाला होता, त्यांना 'एक्स्टसी'च्या गोळ्या खेमलानीनेच पुरवल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर तो तातडीने थायलंडला पळून गेला होता. मात्र, शुक्रवारी सकाळी तो मुंबई विमानतळावर उतरताच पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

**गर्लफ्रेंडच्या खात्याचा असा व्हायचा वापर**

या प्रकरणात पोलिसांनी यापूर्वी जिया जेकब नावाच्या तरुणीला अटक केली होती, जी मीरा रोड येथे खेमलानीसोबत राहत होती. तपासादरम्यान असे दिसून आले की जियाच्या बँक खात्याचा वापर ड्रग्जच्या व्यवहारांसाठी केला जात होता. अटकेच्या वेळी तिच्या खात्यात सुमारे 50 लाख रुपये जमा होते, ज्याबद्दल ती समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. तिने कबुली दिली की, तिचा पेमेंट क्यूआर कोड खेमलानीकडे असायचा आणि तोच ग्राहकांकडून पैसे घेण्यासाठी याचा वापर करायचा.

**आंतरराष्ट्रीय कनेक्शनची शक्यता**

खेमलानी हा मूळचा हाँगकाँगचा रहिवासी असून त्याच्याकडे थायलंडचे नागरिकत्व असल्याचीही शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. तो परदेशात पळून गेल्याची माहिती मिळताच त्याच्याविरुद्ध लुकआउट सर्कुलर जारी करण्यात आले होते. शुक्रवारी तो विमानतळावर येताच यंत्रणेने अलर्ट दिला आणि मुंबई पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. 11 एप्रिलच्या त्या दुर्दैवी घटनेनंतर पोलिसांनी या प्रकरणाचा धागादोरा पकडत आतापर्यंत एकूण 12 जणांना अटक केली आहे. हे ड्रग्ज आंतरराष्ट्रीय स्तरावरून तस्करी करून भारतात आणले जात होते का, याचा तपास आता पोलीस करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com